# जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा

## -: दरपत्रक सुचना :-

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा व अधिनस्थ दुय्यम न्यायालयांच्या आस्थापनेवरील तसेच तालुका न्यायालयाचे आस्थापनेवरील वॉटर कुलरवरील स्थापित जलशुध्दीकरण यंत्रे नियमित दुरुस्ती व देखभाल करण्याकरीता दुरुस्ती/सर्व्हीसींगचा वार्षिक सेवा संविदा करार करण्याबाबतचे दरपत्रक मागविण्यात येत आहे. करीता ज्या इच्छुक व्यक्तींना/संस्थेला वॉटर कुलरवरील जलशुध्दीकरण यंत्रे नियमित दुरुस्ती/देखभाल करण्याकरीता दुरूस्ती/सर्व्हीसींगचा वार्षिक सेवा संविदा करार करणेबाबतचे दरपत्रक दाखल करावयाच्या आहेत, त्यांनी आपले दरपत्रक सिलबंद लिफाफ्यामध्ये आवश्यक त्या सर्व दराने विवरणासह जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील कार्यालयात दिनांक ०३/०७/२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सादर करावे.

खालीलप्रमाणे तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा व अधिनस्थ दुय्यम न्यायालयांच्या आस्थापनेवरील तसेच तालुका न्यायालयाचे आस्थापनेवरील जलशुध्दीकरण यंत्रे नियमित दुरूस्ती/सर्व्हीसींग करण्याबाबतचा वार्षिक सेवा संविदा करार करावयाचा आहे.

| अ.क्र. | न्यायालय/आस्थापना | जल शुध्दीकरण यंत्र संख्या |
|---|---|---|
| 1 | जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा | 8 |
| 2 | जिल्हा व सत्र न्यायालय-१ हिंगणघाट | 1 |
| 3 | सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, हिंगणघाट | 3 |
| 4 | दिवाणी न्यायालय, क. स्तर, पुलगांव | 2 |
| 5 | दिवाणी न्यायालय, क. स्तर, आर्वी | 2 |
| 6 | दिवाणी न्यायालय, क. स्तर, आष्टी | 1 |
| 7 | दिवाणी न्यायालय, क. स्तर, कारंजा (घा) | 1 |
| 8 | दिवाणी न्यायालय, क. स्तर, सेलु | 1 |

| | | |
|---|---|---|
| 9 | दिवाणी न्यायालय, क. स्तर, समुद्रपूर | 2 |
| | एकुण | 21 |

<u>आस्थापनेंवरील जलशुध्दीकरण यंत्रे नियमित दुरुस्ती/देखभाल करण्याकरीता दुरुस्ती सर्व्हीसींगचा वार्षिक सेवा संविदा करार करण्याबाबतच्या अटि व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.</u>

१) बंद अवस्थेमध्ये अंसलेले जलशुध्दीकरण यंत्रे सुरू करणे.

२) दर महिन्याला वॉटर कुलरवरील स्थापीत जलशुध्दीकरण (वॅाटर प्युरीफायर) यंत्राची साफसफाई करावी.

३) वॉटर कुलरवरील स्थापीत जलशुध्दीकरण यंत्राची दुरूस्ती/सर्व्हीसींग करतांना त्यामधील सुटे भाग नादुरूस्त झाले असल्यास ते निशुल्क बदलवुन नविन सुटे भाग स्थापीत करावे लागेल. त्याकरीता अतिरिक्त शुल्क आकारता येणार नाही.

४) जलशुध्दीकरण यंत्राची कॅन्डल वर्षातुन तीन वेळा न चुकता बदलवून नविन लावावी. कॅन्डल साहित्य बदलल्याबाबत संबंधीत आस्थापनेची नोंद घ्यावी.

५) सेवा-संविदा करार करतांना त्यामध्ये सर्व दर हे करासहीत दर्शवावे.

६) जलशुध्दीकरण यंत्र नादुरूस्त असल्याचे आपणांस कळविण्यात आल्यावर २४ तासांचे आत सदर यंत्राची दुरूस्ती करणे अनिवार्य आहे. त्याकरीता कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क प्रदान केल्या जाणार नाही.

७) आपणांकडे सेवा संविदा करारानुसार देण्यात येणाऱ्या सेवा असमाधानकारक वाटल्यास आपणांसोबत करण्यात आलेला सेवा संविदा करार मुदतीपुर्वी मोडीत काढण्याचा सर्वस्वी अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा यांना आहे.

८) कार्यालयीन/सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी दुरूस्ती/देखभाल कामाकरीता बोलाविल्यास सदर कामाकरीता आपणांस येणे बंधनकारक राहील.

९) सेवा संविदा करारानुसार न्यायालयातील जलशुध्दीकरण यंत्राची केलेली दुखभाल तसेच लावण्यात आलेल्या सुटया भागांची माहिती वेळोवेळी कार्यालयास देणे तसेच नोंद रजिस्टरमध्ये घेणे बंधनकारक असेल.

१०) सेवा संविदा करारानुसार जलशुध्दीकरण यंत्रांच्या देखभाली संदर्भातील देयके दर चार महिन्यानंतर कार्यालयाकडे न चुकता सादर करणे बंधनकारक असेल.

११) जल शुध्दीकरण यंत्राच्या दुरूस्ती/देखभालीबाबतचा सेवा करार हा करार सुरू झाल्याच्या दिनांकापासुन ०१ वर्षे कालावधीपर्यंत राहील.

१२) जल शुध्दीकरण यंत्राच्या दुरूस्ती/देखभालीबाबतच्या सेवा संविदा करारामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई, यांचेकडुन वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार आवश्यक बदल करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा यांचेकडे सुरक्षीत आहेत. तसेच याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे निर्देश आपणांस बंधनकारक असेल.

स्वा./-
(संजय भारूका)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा.

पृष्ठांकण क्र.२६८९/वॉटर कुलर दुरुस्ती/२०२४.
दिनांक :२६/०६/२०२४.
प्रतीलीपी माहीतीस व योग्य कार्यवाहीस सादर :

१) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
२) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
३) तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
४) जिल्हा परीषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
५) नगर परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
६) सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
७) जिल्हा संगणक प्रणाली, संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.

प्रबंधक 26.6.24
जिल्हा व सत्र न्यायालय
वर्धा.